www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–26 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, २ मार्च 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

**हजारोंसाठी आशेचा किरण: थॅलेसेमिया बाल सेवा योजनेअंतर्गत जीवनरक्षक बीएमटीसाठी ऐतिहासिक करार**

सविस्तर वृत्त पान ४ वर

## रजिस्टी कार्यालयातील अधिकारी आणि एजंटांचे नाते म्हणजे
# तुझं माझं जमेना अन् तुझ्या विना करमेना...!

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

'सदैव कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहणारे कार्यालय म्हणजे रजिस्ट्री कार्यालय मागील आठवड्यात मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी सह दुय्यम निबंधक गायब असल्याने खासगी व्यक्तीनेच घेतला सर्वासमक्ष खुर्चीचा ताबा घेत दस्तही हाताळले होते. दस्त नोंदणीचे कामकाज हातळणाऱ्या सह दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांशिवाय पानही हालत नाही, असा सार्वत्रिक अनुभव असतानाच या कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी ज्या दलालांना पोसले तेच आज त्यांच्यावर भारी पडल्याचे चित्र छत्रपती संभाजीनगरातील सह दुय्यम निबंधक कार्यालयात पहायला मिळाले. कार्यरत सह दुय्यम निबंधकाने रजेवर जाताना पदभार सोपवलेल्या समकक्ष अधिकारी वेळेवर कार्यालयात हजर न झाल्यामुळे ताटकळत बसलेल्या नागरिकांनी एका खासगी व्यक्तीची सह दुय्यम निबंधक म्हणून बहुमताने निवड केली. निवडीनंतर हा व्यक्ती सह दुय्यम निबंधकाच्या खुर्चीवर जाऊन बसला आणि त्यांनी दस्तही हाताळल्याचा धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगरच्या सह दुय्यम निबंधक क्रमांक–२ कार्यालयात घडला. याला जबाबदार अधिकारी वर्ग आहेत. कार्यालयातील अधिकारी आणि एजंटांचे नाते म्हणजे तुझं माझं जमेना अन् तुझ्या विना करमेना असा प्रकार आहे.




दस्त नोंदणीसाठी कार्यालयात नागरिकांची गर्दी झाली होती. परंतु ११ वाजले तरी सह दुय्यम निबंधकच न आल्याच पाहून अबु आला हाश्मी या खासगी व्यक्तीने चक्क सह दुय्यम निबंधकाच्या कार्यालयाचा ताबा घेतला. अधिकारी वेळेवर आले नसल्याने जनतेने आपल्याला सह दुय्यम निबंधक म्हणून नियुक्ती केले असून मी आता कारभार करणार असे म्हणत सह दुय्यम निबंधकांच्या खुर्चीवरही जाऊन बसला होता. त्याची हिंमत होतेच कशी काय? याला जबाबदार अधिकारीच आहेत.

**दलालांना पोसतात अधिकारीच !**

दस्त नोंदणी विभागात दररोज होणारे बेकायदेशीर दस्त नोंदणीचे इनपुट कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडूनच घेऊन काही दलाल अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करतात. कार्यालयातून ठराविक रक्कम घेऊन जातात, अशी चर्चा आहे. कार्यालातील बेकायदेशीर कामांची माहिती कर्मचारीच दलाल व ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांना देतात. त्या माहितीच्या आधारे उपोषण, आंदोलने, माहिती अधिकारातील अर्ज, कोर्टकचेरीची प्रकरणे जन्माला येतात. दलालांना पोसणारी मोठी साखळी विभागातच आहे. तसेच खाजगी व्यक्तीही या ठिकाणी बेकायदेशीरित्या काम करतात. त्यामुळे येथील कारभाराची चौकशीची मागणी होत याहे. दरम्यान मंगळवारी दिवसभरात २५० दस्त नोंदणी झाले नाहीत. त्यामुळे मंगळवारी दिवसभरात राज्य सरकारचा सुमारे एक ते दीड कोटींचा महसूल बुडाल्याचे सांगण्यात येते. त्याची जबाबदारी निश्चित करून कारवाई करणार का? असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे.

**गांगुर्डेविरुद्ध घोषणाबाजी**

सह दुय्यम निबंधक क्रमांक २ च्या खुर्चीचा ताबा घेणारा अबु लाला हाश्मी याने सकाळी कार्यालयात केवळ गोंधळच घातला नाही तर अधिकारी गुन्हा दाखल करण्यास पोलीस ठाण्यात पोहोचल्याचे दिसून येताच सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास १० ते १५ जणांना गोळा केले. नोंदणी विभागाच्या विरोधात घोषणाबाजी केली. जेडीआर गांगुर्डे मुर्दाबाद अशा घोषणाही दिल्या, दिल्याचे सूत्रांनी सांगितले होते. तशी नोंद ही सिटी चौक पोलिसात नोंदवलेल्या एफआयआरमध्ये आहे.

## रसूल यांच्यावर कारवाई करण्यास अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ

सहाय्यक सय्यद रसूल यांच्यावर सह. जिल्हा निबंधक विवेक गांगुर्डे यांचा हात असल्याची रजिस्टी कार्यालयात जोरदार चर्चा सुरू असल्याची माहिती सूत्रांनी नाव न सांगण्याच्या अटीवर 'अट्टल मत'ला दिली होती. यावर सविस्तर वृत्त मालिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. सहा. निबंधक सय्यद रसूल यांच्यावर कारवाई करण्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. अधिकाऱ्यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले होते की, तुम्ही आम्हाला पुरावे आणून द्या आम्ही कारवाई करतो. आमचे काम आम्ही प्रसिद्ध केले आता अधिकाऱ्यांनी त्यांचे काम करणे महत्त्वाचे होते परंतु तसे न करता वेळ मारून नेल्याचा प्रकार दिसत आहे.आमचा उद्देश फक्त इतकाच आहे की, फसवे व बोगस कामे करणाऱ्याला वठणीवर आणले पाहिजे. परंतु तसा प्रकार होतांना मात्र दिसत नाही.

## सहाय्यक दुय्यम निबंधक सय्यद रसूल यांनी केलेल्या बेकायदेशीर दस्त नोंदणी 'अट्टल मत' च्या हाती

### साहेब हे घ्या पुरावे आता तरी कारवाई करा.!

सय्यद रसूल यांनी सोयगाव येथे कार्यरत असताना आपल्या शासकीय पदाचा दुरुपयोग करून काही एजंटांशी हात मिळवणे करून आपल्या आर्थिक स्वार्थापोटी नियमबाह्य दस्त नोंदणी केले आहेत त्या दस्त नोंदणी अटलमत वृत्तपत्राच्या हाती लागल्या आहेत त्याचे दस्त क्रमांक पुढील प्रमाणे आहे १३८१, १३८२, १३८३, १३८४, १३८५, १४१५, १४१६, १४१७, १४१८, १४१९, १४२० हे वडगाव कोल्हाटी चे असून दस्त क्रमांक १७२८ हे गंगापूर येथील आहे त्यानंतर झाल्टा येथील अंडर व्हॅल्युएशनचे दस्त नोंदणी केले आहे सन २०२१ आणि सन २०२३ मध्ये त्यांनी बोगस एन- ए-द्वारे सुद्धा दस्त नोंदणी केले आहे या सर्व दस्तावेज 'अट्टल मत'च्या हाती लागलेले आहेत.

# बेगमपुराचे नाव बदलून शिवपुरा करू- आमदार संजय केणेकर

**दिनेश परदेशी**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर जयसिंगपुरा येथे नागराज गायकवाड यांच्या भाजप प्रवेशानिमित्त बोलताना विधानपरिषदेचे आमदार संजय केणेकर म्हणाले की, बेगमपुरा नाव घेताना मला कसे तरी वाटते. येथे जवळच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पादस्पर्शाने पावण झालेली भूमी आहे जेथे भगवान शंकराचे मंदिर आहे तेथे महाराजांनी दर्शन घेतले आहे. याच धर्तीवर बेगमपुराचे नाव बदलून शिवपुरा करावे असे मला वाटते आणि ते करूनच राहू. शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकू आणि नागरिकांच्या मनावर सदैव राज्य करू, असेही विधानपरिषदेचे आमदार संजय केणेकर यांनी सांगितले.

राज्यात विधानसभेमध्ये सर्वात जास्त लोकप्रतिनिधी भारतीय जनता पार्टीचे निवडून आले. लोकसभा, विधानसभा, महानगरपालिकेमध्ये, जिल्हा परिषद, पंचायत नगरपंचायत नगर परिषदेमध्ये भारतीय जनता पार्टीची सगळ्यात जास्त लोकप्रतिनिधी निवडून आले. जातीयवादी असतो तर शत प्रतीक्षत भारतीय जनता पार्टीने आगेकुछ केली नसती सर्व वर्गामध्ये काम करण्याचं काम भारतीय जनता पार्टीने केलेले आहे आत्ताच राजूभाऊंनी सांगितलं खऱ्या अर्थाने काम करताना त्यांचा आत्मबल वाढवण्यासाठी समाजाचा आत्मबल वाढवण्यासाठी ज्या ज्या भूमिका भारतीय जनता पार्टीत ५० वर्षात आत्तापर्यंत कोणत्याच पार्टीने घेतल्याने त्या भूमिका भारतीय जनता पार्टीने घेतलेले आहे मी त्यात जास्त बोलत जात नाही. या देशांमध्ये विकास करताना विकास जरी आमचा केंद्रबिंदू असला तरी देव देश धर्म आणि संस्कृती हे ग्राह्य धरूनच आमचा विकास होणार आहे आणि त्यामुळे निश्चितपणे या भूमिकेत आम्ही सदैव राहणार आहे आणि आता तर महानगरपालिकेवर सत्ता आणून दाखवली. जगातली पर्यटक इथं येतात या भागला मला बेगमपुरा म्हणताना कसतरी वाटतं राव शिवपुरा म्हणायला चालू करा, छत्रपती शिवाजी महाराज संभाजीनगरमध्ये जिथे आलेत जिथे महाराजांचे नाव नाही घ्यायचं तर कुठे घ्यायचे आणि त्यामुळे शिवपुरा म्हणतांना सांगतो



जगाचा पर्यटन इथं असताना जगातले लोक इथे येत असताना याचं प्रदर्शन कसं होत असेल या शहरातली गुंडगिरी उखडून टाकायची आहे.

बेकायदेशीर अतिक्रमणे उखडून टाकायचे मग ते कोणाचेही असोत लोकांनी आम्हाला सत्ता दिली की तुम्ही दाखवा बदलून या शहराचा चेहरा मोहरा आणि निश्चितपणे तुमच्या स्वप्नात आहे ते बेगमपुरा नाव बदलून टाकू शिवपुरा हे नाव देवू, लोकांना आनंद वाटेल इतके मोठे रस्ते अतिक्रमण राहणार नाही अशा सर्व वसाहती इथे दिसतील. त्या महलाला बघण्यसाठी लोक येथे येतात. शिवाजी महाराजांच्या त्या महादेवाचे मंदिर शिवमंदिर पाहायला सुद्धा येतील एवढी भव्यता या बेगमपुराला देण्याचे काम भारतीय जनता पार्टी निश्चित करेल यावेळेस एवढेच सांगतो निश्चित आहे. आमच्या लक्षात आहे रोड ड्रेनेज साफसफाई पाणी या भूमिका आमच्या पहिल्या आहे. जबाबदारी म्हणून आम्ही ते प्रथम कर्तव्य म्हणून आम्ही करणार आहोत अपेक्षिताला कसं उभं करायचं माझ्या माता भगिनींना तरूणांना कशी उभारी द्यायची ते आम्हाला माहित आहे. महानगरपालिकेच्या भूमिकेतून आम्ही खऱ्या पद्धतीने प्रामाणिक पद्धतीने ही भूमिका राबवून वेगवेगळ्या योजना राबवून याच्यातून बेरोजगार माताला स्वाभिमान या भूमिका आम्ही करू. गल्ली पासून दिल्लीपर्यंत तुम्ही भारतीय जनता पार्टी सोबत राहिलात तुमचं परत एकदा धन्यवाद करतो महानगरपालिकेत तुम्ही भरभरून मतदान केलं भारतीय जनता पार्टीला नागराज भाऊ तुम्ही ज्या अपेक्षाने आपल्या समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत आले त्या तुमच्या संपूर्ण अपेक्षाने पूर्ण होतील एवढी ग्वाही मी इथे देतो आणि माझे मार्गदर्शन थांबवतो, असे संजय केणेकर म्हणाले.

## ...तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद

**फाल्गुन** महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंत:करणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना ङ्गबुरा न मानो होली हैङ्घ असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.

महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे.

सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी. होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, ङ्गरंगपंचमीच्या शुभेच्छाङ्घ देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे. होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे.

# श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या त्यागात देश सदैव ऋणात - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

नवी मुंबई, दि. ०१ : ङ्गहिंद दी चादरङ्घ म्हणून संपूर्ण देशात आदराने ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे शहिदत्व हे केवळ शीख समाजासाठी नव्हे, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांच्या रक्षणासाठी आपले शीश अर्पण केले. देश त्यांच्या या त्यागाचा सदैव ऋणी राहील, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले.

अल्पसंख्यांक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने नवी मुंबईतील खारघर येथे 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमात गृहमंत्री शाह बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अखिल भारतीय धर्मजागरणचे प्रमुख शरदराव ढोले, शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंह जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज, बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबूसिंग महाराज, राज्यस्तरीय समनव्य समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, राज्यस्तरीय समन्वय समितीचे निमंत्रक बल मलकित सिंह आदी उपस्थित होते.

या उपक्रमाचे महत्त्व विषद करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, प्रत्येक गुरुद्वारा आणि प्रत्येक वस्तीपर्यंत 'हिंद दी चादर'चा संदेश पोहोचविण्यासाठी बाबा हरनाम सिंगजी यांनी मोठे कार्य केले आहे. राज्य शासनाने यापूर्वी नांदेड व नागपूर येथे आयोजित केलेल्या 'हिंद दी चादर' महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून नवी मुंबईतील कार्यक्रमात शीख बांधवांसह विविध समाजघटकांचा मोठा सहभाग असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शीख समाजासाठी सेवाकार्याची संधी साधत विविध प्रसंगी त्यांच्या परंपरा, श्रद्धा आणि योगदानाचा गौरव केला आहे. त्याच धर्तीवर देशभर 'हिंद दी चादर' पर्वाचे आयोजन करण्यात येत असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले.

यावेळी संत परंपरेचे स्मरण करताना त्यांनी पोहरादेवी येथील सेवालाल महाराज तसेच संत नामदेव महाराज यांना वंदन केले. संत नामदेव यांच्या रचनांचा समावेश गुरु ग्रंथ साहिबमध्ये झालेला आहे, ही भारतीय संतपरंपरेच्या व्यापकतेची साक्ष असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच संत रविदास यांसारख्या संतांच्या विचारांनाही गुरु ग्रंथ साहेबमध्ये स्थान मिळाले आहे, यावरून भारतीय अध्यात्माची सर्वसमावेशकता स्पष्ट होते, असे त्यांनी नमूद केले.

नववे श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या शहादतीचा विशेष उल्लेख करताना केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले की, अन्याय आणि अत्याचारांविरोधात उभे राहून त्यांनी दिलेले शहिदत्व भारतीय इतिहासातील अत्यंत प्रेरणादायी घटना आहे. ङ्गशीश दिया, पर सिर न झुकायाङ्घ हीच शीख गुरुपरंपरेची ओळख असून भारताच्या अखंडतेचा तो आधार आहे.

शीख परंपरेतील नामजप, आराधना आणि लंगर यांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, या मूल्यांमधून समाजातील समरसता आणि बंधुभाव दृढ होतो. गुरु गोविंद सिंग यांच्या काळात खालसा पंथाची स्थापना झाली आणि धर्मरक्षणासाठी अद्वितीय त्यागाची परंपरा अधिक बळकट झाली. त्यांच्या चारही सुपुत्रांच्या शहादतीनेही या परंपरेला अमरत्व प्राप्त झाले, असे त्यांनी नमूद केले.

आनंदपूर साहिबसारख्या पवित्र स्थळांचा उल्लेख करत केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले की, अन्यायकारक फर्मानांसमोर न झुकता गुरूंनी दाखवलेले साहस भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदले गेले आहे. नववे गुरु श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा संदेश महाराष्ट्र शासन राज्यातील छोट्या-छोट्या गावांपर्यंत पोहोचवत आहे, याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन केले. भारताची संस्कृती 'सर्व धर्म समभाव' या तत्वावर आधारलेली आहे. ही परंपरा जपण्यासाठी शीख गुरूंनी केलेले योगदान अमूल्य आहे. अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध उभे राहणे हीच खरी देशभक्ती असल्याचे केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी यावेळी सांगितले. स्वातंत्र्यानंतरही देशाच्या सुरक्षेसाठी शीख जवानांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी अशा ऐतिहासिक कार्यक्रमांची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी शहिदी समागम समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंग जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री शाह यांना जफरनामा देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र आणि पंजाबमधील अध्यात्मिक व ऐतिहासिक संबंध बाबा हरनाम सिंग जी, मुखी, दमदमी टकसाल, प्रधान संत समाज राज्य समन्वय समितीचे मार्गदर्शक बाबा हरनाम सिंग म्हणाले की, नागपूर आणि तख्त सचखंड श्री हजूर साहिब, नांदेडनंतरचा हा तिसरा आणि सर्वात मोठा कार्यक्रम ऐतिहासिक उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र आणि पंजाबमधील अध्यात्मिक व ऐतिहासिक संबंधांना उजाळा दिला. भारतीय संस्कृतीवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या बलिदानामुळेच आज भारतीय संस्कृती सुरक्षित आहे. संत नामदेव महाराज आणि गुरु नानक देव जी यांच्या काळापासून हे दोन्ही प्रांत जोडलेले आहेत. दहावे गुरु श्री गुरु गोविंद सिंह जी यांनी पंजाबमधून येऊन नांदेडच्या पावन भूमीवर वास्तव्य केले, ज्यामुळे हे नाते अधिक घट्ट झाले आहे. महाराष्ट्र शासनाने अतिशय स्तुत्य निर्णय घेतले आहेत. ब्रिटीश काळापासून सिखलीगर समाजावर लादलेले निर्बंध हटवून त्यांना सन्मानाचे आणि समानतेचे अधिकार देण्याचे श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

**राज्य शासनाच्या सहकार्याने जनजागरण- शरदराव ढोले**

अखिल भारतीय धर्मजागरण मंचाचे प्रमुख शरदराव ढोले यांनी प्रास्ताविकात संत नामदेव महाराजांच्या पंजाब-महाराष्ट्रातील आध्यात्मिक नात्याचा उल्लेख केला आणि वारकरी, सिंधी, मोहियाल तसेच गुरु नानकांना गुरु मानणाऱ्या विविध समाजघटकांना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले. उदासीन संप्रदायाच्या सहभागासह महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ९६ रथांच्या माध्यमातून सुमारे २० हजार गावांमध्ये जनजागरण करण्यात आले असून ५०० हून अधिक पूर्णकालीन कार्यकर्त्यांच्या तीन महिन्यांच्या परिश्रमातून हा भव्य कार्यक्रम यशस्वी झाल्याचे त्यांनी नमूद केले.

# जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी कृती आराखडा तयार करा-जिल्हाधिकारी स्वामी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ४८५ ग्रामपंचायती ह्या क्षयमुक्त जाहीर झाल्या आहेत. उर्वरीत ३९० ग्रामपंचायतींमध्ये हा कार्यक्रम प्रभावीपणे राबवून जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी कृती आराखडा तयार करा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे दिले.

जिल्हा आरोग्य यंत्रणेच्या विविध समित्यांची बैठक आज पार पडली. जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडलेल्या बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा, वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मजा सराफ, जिल्हा क्षयरोग नियंत्रण अधिकारी डॉ. वैशाली डकले, जिल्हा सांख्यिकी अधिकारी लिपारे, साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. सारिका लांडगे, डॉ. जयश्री लहाने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. विनायक मुंडे उपस्थित होते तसेच सर्व तालुका वैद्यकीय अधिकारी, ग्रामिण रुग्णालयाचे अधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीने सहभागी झाले होते.

**विविध समित्यांचा आढावा**

जन्म मृत्यू नोंदणी व जीवन विषयक आकडेवारी जिल्हास्तरीय समन्वय समिती, वातावरणीय बदल व मानवी आरोग्य , नियमित लसीकरण, गोवर रुबेला लसीकरण मोहिम, १५ वा वित्त आयोग, महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम,आपत्कालीन वैद्यकीय सेवा, राष्ट्रीय एड्स निर्मूलन कार्यक्रम, हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, रुग्ण कल्याण समिती, बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोध समिती इ. अशा समितींचा आढावा घेण्यात आला.

**जिल्हा क्षयरोग मुक्तीसाठी कृतीआराखडा तयार करा** – बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत ४ लक्ष ४१ हजार १८१ क्षयरोग प्रवण लोकांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्याद्वारे जिल्ह्यातील ८७५ ग्रामपंचायतींपैकी ४८५ ग्रामपंचायतीत क्षयरोग असलेले लोक आढळले नाहीत. त्यामुळे ह्या ग्रामपंचायती क्षयमुक्त घोषीत झाल्या आहेत. या चाचण्यात संशयित म्हणून जे रुग्ण आढळले आहेत त्यांच्या क्ष किरण व प्रयोगशाळा चाचण्या करुन त्यांना क्षय संसर्ग आहे किंवा नाही हे निदान होईल, असे रुग्ण २४ हजार ३३८ आहेत असे बैठकीत सांगण्यात आले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी निर्देश दिले की, जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीतील संशयित रुग्णांच्या प्रयोगशाळा व क्ष किरण चाचण्या करण्यासाठी शासकीय व खाजगी प्रयोगशाळांची मदत घ्यावी. त्यासाठी जिल्हास्तरावरुन समन्वय साधावा. बाधीत रुग्णांवर उपचार व नंतर पुनर्वसन करुन जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी कृती आराखडा तयार करावा.

**बोगस डॉक्टरची माहिती कळिवण्याचे आवाहन**

जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ५ बोगस वैद्यकीय व्यावसायिक आढळले. ही मोहीम अधिक तीव्र करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिल्या. जिल्ह्यात बोगस डॉक्टर आढळल्यास त्याबाबत नागरिकांनी तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. तक्रार कर्त्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल,असेही त्यांनी सांगितले.

**जन्म नोंदींची पडताळणी करा**

जन्म मृत्यू नोंदणी विषयक जिल्हास्तरीय समन्वय समितीस मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, जन्म नोंदींची पडताळणी करावी. गटविकास अधिकारी, ग्रामसेवक व तालुका आरोग्य अधिकारी यांनी ही पडताळणी करावी व जिल्हास्तरीय समितीकडे अहवाल सादर करावा,असे निर्देश दिले.

**पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांचा सन्मान**

या बैठकीत, राज्य शासनाच्या आरोग्य सेवेचे सन्मान पुरस्कार प्राप्त कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. आशा स्वयंसेविका मिरा तिरछे, प्रा. आ. केंद्र बालानगर, प्रा. आ. केंद्र लाडगाव, ग्रामिण रुग्णालय पाचोड येथील अधिकारी कर्मचारी यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# ज्ञान संदीप शिक्षण संस्थेत राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती उत्साहात



छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

२३ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल डॉ .बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको एन ७ छत्रपती संभाजी नगर येथे राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्रा.प्रकाश सोनवणे व संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे व तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे यांची विशेष उपस्थिती होती . प्रथम राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला मान्यवरचा हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचे सुप्रसिद्ध कीर्तन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे गाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर महात्मा ज्योतिबा फुले व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळा समोर स्वच्छता करण्यात आली. व त्यांच्या जीवनकार्याविषयी विशेष माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुकाराम हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे व कुमारी.पायल मिसाळ कुमारी मगरे या विद्यार्थ्यांनी केले. तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री सुनील चौधरी साहेबराव शिंदे विजय पाटील नजमा खान रत्नमाला घोरपडे वैशाली बागुल यांनी केले. तर संस्थेच्या सचिव श्रीमती संगीता खिल्लारे यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. शेवटी आभार प्रदर्शन श्री.हर्षल पगारे यांनी केली.

# मिसरवाडीतील ज्ञान संदीप विद्यालयात विज्ञानाचा जल्लोष; स्मार्ट सिटी, गोबर गॅस, विद्युत चुंबक; विद्यार्थ्यांची वैज्ञानिक झेप






छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित ज्ञानसंदिप प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मिसरवाडी छत्रपती संभाजी नगर येथे विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न झाले सर्वप्रथम संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे व सचिव संगीता खिल्लारे यांच्या हस्ते डॉ. एपीजे अब्दुल कलाम व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर विज्ञान प्रदर्शनाचे मान्यवयाच्या हस्ते उद्घाटन झाले.

यामध्ये ज्वालामुखी ,पाण्याची घनता, ठिंबक सिंचन, विद्युत चुंबक बनविणे, उष्णता ऊर्जा निर्मिती, वेळ यंत्र, क्रेन ,गोबर गॅस पासून वीज निर्मिती, वाऱ्यावर चालणारी पवनचक्की ,पाणी शुद्ध करणे ,आग्नीला ऑक्सिजनची गरज स्मार्ट सिटी, हवेचा दाब, वाशिंग मशीन ,कुलर ,मिसाईल असे विविध ३५ प्रयोग




सादर केले. या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक श्री. अभिजीत सोनवणे यांनी केले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे व सचिव संगीता खिल्लारे यांची विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी तुकाराम सोनवणे स्कूलचे मुख्याध्यापक श्री. संदीप सोनवणे यांचा वाढदिवस सुद्धा मोठ्या उत्साहात साजरा करून सर्व विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अजयकुमार खिल्लारे, किरणकुमार सोनवणे, स्वामी जाधव ,गौतम मकासरे, विजय आगाव, संजय चौधरी, साहेबराव शिंदे, विजय पाटील ,नजमा खान ,वैशाली बोरुडे, आनंद सातदिवे तायरा पठाण,सुनील चौधरी,वैशाली बागुल, रत्नमाला घोरपडे नय्युम शेख सुनिता शेजुळ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक अभिजीत सोनवणे यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन किरणकुमार सोनवणे यांनी मानले.

# चाळीसगाव शहरात लवकरच विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्णाकृती स्मारक होणार - आमदार मंगेशदादा चव्हाण यांचे आश्वासन

## ‘१४ मार्च रोजी स्मारक समिती गठीत होणार...

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

चाळीसगाव शहरात रेल्वे स्टेशन जवळ लवकरच विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पूर्णाकृती स्मारक उभारण्यात येईल याबद्दल तालुक्याचे लोकप्रिय, धडाडीने काम करणारे आमदार मा.मंगेशदादा चव्हाण यांनी आंबेडकरप्रेमी शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत आश्वासन दिले आहे.

या स्मारकाच्या पूर्ततेची कारवाई जलद व्हावी यासाठी स्मारक समिती गठीत करावी व यासाठी १४ मार्च रोजी बैठक आयोजित करावी अशी सूचना देखील आमदार साहेबांनी केली. त्यानुसार ही बैठक १४ मार्च रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह नवी इमारत येथे आयोजित केली जाणार असून ही बैठक माननीय आमदार मंगेशदादा चव्हाण यांचे उपस्थितीत होणार आहे. याबाबत आंबेडकरप्रेमी समाजात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेली अनेक वर्षापासून चाळीसगाव रेल्वे स्टेशन परिसरात हे पूर्णाकृती स्मारक व्हावे अशी मागणी केली जात होती. त्याअनुषंगाने ऑगस्ट २०२१ मध्ये चाळीसगाव नगरपालिकेने विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती स्मारक चाळीसगाव रेल्वे स्टेशन परिसरात करण्यात यावे असा ठराव एकमताने केला आहे. परंतु गेल्या ५ वर्षात नगरपालिका प्रशासनाने यावर कोणतीही कारवाई केली नव्हती.त्यामुळे सर्वप्रथम समता सैनिक दल आणि त्यानंतर बहुजन आझाद सेनेतर्फे आंदोलन करण्यात आले. तसेच आर. पी.आय. ,वंचित बहुजन आघाडी यांचे तर्फे निवेदन देण्यात आले होते. त्यामुळे तालुक्यातील वातावरण ढवळून निघाले. या नियोजित स्मारकाबाबत तालुक्यात उत्कंठा वाढू लागली. या पार्श्वभूमीवर आम दार मंगेशदादा चव्हाण यांच्याशी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नुकतेच आंबेडकर प्रेमी शिष्टमंडळाने समता सैनिक दलाचे राज्याध्यक्ष तथा चाळीसगाव तालुका बौद्ध पंचायतचे सरचिटणीस मा.धर्मभूषण बागुल यांचे नेतृत्वात ही भेट घेतली. यासाठी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक आयु.रामचंद्रभाऊ जाधव, व नूतन नगरसेवक संभाआप्पा जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. या शिष्टमंडळात आर.पी.आय.चे आनंद खरात , ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गौतम जाधव , देविदास तात्या जाधव , रा.वि.प्र.शिक्षण मंडळाचे संचालक महेशबापू चव्हाण, आम आदमी पार्टीचे ॲड.राहुल जाधव, समता सैनिक दलाचे शरद जाधव, नपाचे आरोग्याधिकारी विजय जाधव, बहुजन आझाद सेनेचे स्वप्नील जाधव व नितीन मरसाळे , समता सैनिक दलाचे अवधेश बागुल हे सहभागी झाले होते.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ; थेट कर्ज योजना १६० जणांचे अर्ज पात्र; दि.६ मार्च रोजी सोडत

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मार्फत थेट कर्ज योजेनअंतर्गत एक लाख रुपये कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. त्याअंतर्गत दिलेल्या मुदतीत ३११ कर्ज मागणी अर्ज स्विकारण्यात आले.त्यातील १६० अर्ज छाननी अंतर्गत पात्र झाले आहेत. तर १५१ कर्ज मागणी अर्ज अपात्र आहेत, असे जिल्हा व्यवस्थापक प्रणिता बोराडे यांनी कळिवले आहे. पात्र अर्जांपैकी प्रत्यक्ष लाभार्थी निवडीसाठी दि.६ माच रोजी सोडत पद्धतीने निवड केली जाणार आहे.

१६० पात्र कर्ज मागणी अर्जांपैकी पुरुष ६५ व महिला ९५ अर्ज आहेत. या योजनेचे जिल्हा कार्यालयास ५० प्रकरणांचे उद्दिष्ट असून अध्यक्ष लाभार्थी निवड समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेल्या मान्येतेनुसार चिठ्याव्दारे (लॉटरी पद्धतीने) निवड करावयाची आहे. त्या करिता शुक्रवार दि. ६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृह खोकडपुरा, शिवाजी हायस्कुलच्या शेजारी छत्रपती संभाजीनगर येथे लाभार्थी निवड समिती तथा निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थीची निवड चिठ्ठयाव्दारे (लॉटरी पद्धतीने) होणार आहे. तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अर्जदारांनी या सोडत बैठकीस उपस्थित रहावे असे आवाहन महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक श्रीमती. प्रणिता रा. बोराडे (सरपते) यांनी केले आहे.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पुस्तकांचे दान; वाचन चळवळीला बळकटी देण्यासाठी ‘बुक बँक’ उपक्रम- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर

(अट्टल मत प्रतिनिधी)

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी यासाठी बुक बँक हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. त्याद्वारे वाचन चळवळीलाही बळकटी मिळेल,असा विश्वास जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज व्यक्त केला.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आज जिल्हा परिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांना ‘बुक बँक’ उपक्रमांतर्गत १००० पुस्तकांचे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून बुक बँक हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी म हसूल अधिकारी- कर्मचारी यांनी स्वतःच्या देणगीतून १००० पुस्तके खरेदी करुन आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण व आश्विनी लाटकर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत या कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फ ुलारी, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, नीलम बाफना, लतिफ पठाण तसेच अन्य महसूल अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक जयश्री चव्हाण यांनी केले. आभार संगिता गायकवाड यांनी मानले.

# कोश क्लोथिंग या मेन्स वेअर स्टोअरचा भव्य शुभारंभ

छत्रपती संभाजीनगर


(अट्टल मत प्रतिनिधी)


शहरातील तरुण उद्योजक आकाश प्रकाश गायकवाड यांनी सुरू केलेल्या कोश क्लोथिंग या मेन्स वेअर स्टोअरचा भव्य शुभारंभ सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शहरातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी मनपा महापौर समीरदादा राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आमदार प्रदीपजी जैस्वाल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, माजी उपमहापौर राजूभाऊ शिंदे, नगरसेवक मिलिंदभाऊ दाभाडे, नगरसेवक अमितभाऊ भुईगळ, नगरसेविका हर्षदा शिरसाट, नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल, क्रांतिचौक पोलीस ठाण्याचे पी.आय. सुनील माने तसेच वेदांतनगर पोलीस ठाण्याच्या पी.आय. प्रविणा यादव यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते रिबीन कापून स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी आकाश गायकवाड यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले असून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# मानव पूर्वज निर्मिती त्यांची उत्क्रांती अभ्यासु आढावा- डॉ. राजेंद्र दाते पाटील

**'बहुरत्ना वसुंधरा'** असं ज्याचं वर्णन केलं जातं ती आपली पृथ्वी विपुल नैसर्गिक साधन संपत्तीने आणि सजीव सृष्टीच्या अस्तित्वाने अतिशय समृध्द आहे. अशा या वसुंधरेच्या निर्मितीचा आणि जीवसृष्टीचा इतिहास मोठा मनोरंजक आहे.मानव पूर्वज निर्मिती त्यांची उत्क्रांती अभ्यासु आढावा- असलेला ग्रंथ म्हणजे

'कथा जैवविविधतेचीङ्ग (प्रवास जीवसृष्टीचा...) हे अभ्यासु लिखाण असल्याचे मत जेष्ठ जलतज्ञ व पर्यावरण विषयाचे अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.





पुढे ते विश्लेषणात म्हणतात की,अठराव्या- एकोणिसाव्या शतकात अनेक थोर तत्त्ववेत्ते, शास्त्रज्ञ होऊन गेले ज्यांनी त्यांच्या त्यांच्या काळातील उपलब्ध साधन सामग्री वापरून,प्रयोगशाळां मध्ये उपलब्ध उपकरणांचा वापर करून पृथ्वीची निर्मिती आणि जीवसृष्टीचा उगम या बद्दल सखोल संशोधन करून अनेक आश्चर्य कारक घडामोडी जगासमोर मांडल्या. हे संशोधन आजच्या आधुनिक काळात देखील सुरु आहे.

अशा या विविध घडामोडींचा विस्तृत आढावा घेऊन पृथ्वीवर पहिला जीव कसा अस्तित्वात आला तेथपासून ते आजच्या

एकविसाव्या शतकापर्यंत जीवसृष्टी कशी उत्क्रांत होत गेली, जैवविविधता कशी निर्माण होत गेली या घडामोडीं मध्ये मानवाचे पूर्वज कसे निर्माण झाले, त्यांची उत्क्रांती कसाही होत गेली या व अशा असंख्य घडामोडींचा सविस्तर आढावा घेणारे 'कथा

जैवविविधतेची (प्रवास जीवसृष्टीचा...)

हे पुस्तक ठाण्याच्या सृजनसंवाद प्रकाशनातर्फे जुलै २०२४ मध्ये प्रकाशित झालं आहे.

ज्येष्ठ पर्यवरणतज्ञ आणि लेखक डॉ. संजय जोशी यांनी या पुस्तकातील कथा लिहितांना काव्य, ललित साहित्य आणि

शास्त्रशुध्द माहिती यांचा सुरेख मेळ घालून या कथा अतिशय रोचक आणि रंजक स्वरुपात वाचकांसमोर ठेवल्या आहेत.

पुस्तकाच्या शीर्षकातच लेखकाच्या कल्पकतेची प्रचिती येते. प्रवास जीवसृष्टीचा- पुढे पूर्णविराम किंवा उद्गारवाचक चिन्ह न वापरता तीन चार टिंब दिली आहेत.साडेतीनशे कोटी वर्षांपूर्वी निर्मिती होऊन सुरु झालेला जीवसृष्टीचा प्रवास अजूनही थांबलेला नाही. तो अविरतपणे सुरूच राहणार आहे हेच लेखकाला यातून सुचवायचे आहे.

पृथ्वीच्या निर्मितीच्या काळात असलेलं वातावरण, त्यानंतर पहिला आदिजीव जन्माला येऊन त्यापासून विविध प्रकारचे कोट्या वधी सजीव कसे निर्माण झाले आणि त्या त्या काळात पृथ्वीच्या वातावरणात कसे बदल होत गेले हे वाचकांना नीट समजावे यासाठी पुस्तकाच्या दुसऱ्या प्रकरणात वाचकांना एका टाईम मशीनमध्ये मध्ये बसवून थेट चारशे पन्नास कोटी वर्षे मागे नेण्यात येतं आणि मग मशीन हळूहळू पुढे सरकत आजच्या काळात परत येत असतांना वाचकांना बाहेर दिसणाऱ्या दृश्यांमधून सजीव सृष्टीच्याउत्क्रांतीचे विविध टप्पे प्रत्यक्ष बघता येतील, अनुभवता येतील अशी कल्पना लेखकाने केली आहे.

या पुस्तकातील विविध प्रकरणांमध्ये लेखक डॉ. संजय जोशी यांनी अशाच नाविन्यपूर्ण कल्पनांनी एखादी गोष्ट सांगावी अशा प्रकारे जैवविविधतेचे अंतरंग उलगडून दाखवले आहे. उदाहरणार्थ, मानवी कृतींमुळे जैवविविधता नष्ट होते आहे आणि यातील एक कृती म्हणजे वन्य प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासांचा होत असलेला नाश. बंगळूरू शहरात जेंव्हा रिंग रोड बांधण्यात आला त्यावेळेस तेथील जंगलात मोठ्या संख्येने अस्तित्वात असलेल्या आणि स्थानिक जैवविविधतेचा एक अतिशय महत्वाचा घटक असलेल्या स्लेंडर लॉरीस या छोट्या, माकड सदृश प्राण्याच्या अधिवासाचे विखंडन होऊन या प्राण्यांच्या एकूण राहणीमान आणि दैनदिन जीवनशैलीवर गंभीर दुष्परिणाम झाला आहे. पुस्तकाच्या पृष्ठ क्र. १७० वर हा प्राणी आपल्याशी संवाद साधून आपली कैफियत मांडतो आहे अशी कल्पना केली आहे.

सजीव सृष्टीमध्ये एकाच कुटुंबा तील वनस्पती,एकाचकुटुंबातील प्राणी यांच्या बाह्य शारीरिक लक्षणांमध्ये विविधता असते हे आपण देखीलबघतो,अनुभवतो. फार लांब कशाला जायचे, आपल्या मानवी प्रजाती मध्ये देखील एकाच कुटुंबातील आई- वडील आणि त्यांची अपत्ये यांच्यात वेग वेगळी लक्षणे असतात.

निसर्गाच्या या अद्भुत किमयेची ओळख करून देण्यासाठी ग्रेगर मेंडल यांनी केलेल्या प्रयोगांची अतिशय सोप्या भाषेत डॉ. संजय जोशी यांनी ओळख करून दिली आहे. मानवी शरीराला एका वस्त्राची उपमा देऊन महाकवी ग. दि. माडगुळकर यांनी 'जगाच्या पाठीवर' या जुन्या अतिशय गाजलेल्या चित्रपटा साठी लिहिलेल्या एक धागा सुखाचा या गाण्यातील 'या वस्त्राते विणतो कोण,एक सारखी नसती दोन,कुणा न दिसले त्रिखंडात या हात विणकराचे' या ओळींचा आधार घेऊन लेखक डॉ. जोशी यांनी जीवसृष्टीतील प्रत्येक सजीवा च्या शरीररूपी वस्त्राचा विणकर म्हणजे पेशींमध्ये असलेले डीएनए आणि आरएने चे रेणू आहेत हे सप्रमाण सिध्द करणाऱ्या जेम्स वाटसन आणि फ्रान्सिस क्रिक या शास्त्रज्ञांच्या प्रयोगाची विस्ताराने माहिती दिली आहे. जैवविविधता मानवाला त्यांच्या दैनदिन जीवन जगण्यासाठी आवश्यक सेवा पुरवत असते त्याची सविस्तर माहिती 'जीविधता - एक जागतिक सहकारी बँक' या प्रकरणात वाचायला मिळत असल्याचे महत्वाचे विश्लेषण जेष्ठ जलतज्ञ व पर्यावरण विषयाचे अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले आहे.

डॉ संजय जोशी यांनी पुढच्या प्रकरणात मानवी कृतींमुळे आणि भौतिक विकासाच्या हव्यासापोटी मानवा कडून जैवविविधतेची किती मोठ्या प्रमाणात हानी होते आहे याचं वर्णन आहे.अर्थात त्यापुढील प्रकरणात लेखकाने जैवविविधता संरक्षण आणि संवर्धना साठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर सरकारी आणि स्वयंसेवी संस्था,व्यक्ती कशा प्रकारे कार्यरत आहेत याच्या काही सकारात्मक घडामोडींच वर्णन केलं आहे. भारत सरकारने केलेले कायदे,आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाची मदत घेऊन जैव विविधतेचे संरक्षण आणि संवर्धन कसे करता येते याचं सविस्तर वर्णन या प्रकरणात वाचायला मिळते.

# हजारोंसाठी आशेचा किरण: थॅलेसेमिया बाल सेवा योजनेअंतर्गत जीवनरक्षक बीएमटीसाठी ऐतिहासिक करार

मराठवाड्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांसाठी जीवनरक्षक उपचारांची नवी दारे खुली झाली आहेत. MMRRI Kamalnayan Bajaj Hospital यांनी 'थॅलेसेमिया बाल सेवा योजना' (तृतीय टप्पा) अंतर्गत Coal India Limited सोबत ऐतिहासिक सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे थॅलेसेमिया मेजर आणि गंभीर अप्लास्टिक ॲनिमियाने ग्रस्त गरजू मुलांसाठी बोन मॅरो प्रत्यारोपण (बीएमटी) उपचारांसाठी संरचित आर्थिक सहाय्य अधिक बळकट होणार आहे.

**३,००० हून अधिक रुग्णांना होणार लाभ**

मराठवाड्यातील १२ वर्षांखालील मुलांसाठी प्रगत बीएमटी सुविधा उपलब्ध करून देणारे हे पहिले आणि एकमेव केंद्र असल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. या योजनेमुळे प्रदेशातील ३,००० पेक्षा अधिक नोंदणीकृत थॅलेसेमिया मेजर रुग्णांना थेट लाभ मिळण्याची अपेक्षा असून, हजारो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे.

**बोन मॅरो प्रत्यारोपण: गंभीर रक्तविकारांवरील प्रभावी उपाय**

बोन मॅरो प्रत्यारोपण हे थॅलेसेमिया मेजर, ल्युकेमिया, लिम्फोमा, मल्टिपल मायलोमा आणि गंभीर अप्लास्टिक ॲनिमिया यांसारख्या रक्तविकारांवरील प्रभावी आणि अनेकदा एकमेव उपचार पर्याय मानला जातो. मात्र आर्थिक अडचणींमुळे अनेक रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नव्हते. नव्या करारामुळे पात्र रुग्णांच्या कुटुंबांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

११० यशस्वी प्रत्यारोपणांचा टप्पा

२०१६ पासून सुरू असलेल्या बीएमटी कार्यक्रमांतर्गत रुग्णालयाने नुकतेच उच्च जोखीम असलेल्या ९ वर्षीय थॅलेसेमिया रुग्णावर यशस्वी प्रत्यारोपण केले. हे एकूण ११०वे प्रत्यारोपण ठरले असून, १०० हून अधिक बीएमटी पूर्ण करणारे मराठवाड्यातील पहिले केंद्र म्हणून रुग्णालयाने प्रादेशिक नेतृत्व सिद्ध केले आहे. बीएमटी कार्यक्रमाचे प्रमुख तज्ज्ञ डॉ. वेंकटेश एकबोटे आणि त्यांची तज्ज्ञांची टीम या योजनेअंतर्गत उपचारांचे नेतृत्व करणार आहेत.

**उपचारांचा हक्क आर्थिक स्थितीवर अवलंबून नसावा**

रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस म्हणाले, ङ्गजीवनरक्षक उपचारांपर्यंतचा प्रवेश हा आर्थिक क्षमतेवर अवलंबून नसावा. कोल इंडिया लिमिटेडसोबतची भागीदारी ही गरजू रुग्णांसाठी संस्थात्मक सहाय्य मजबूत करण्याच्या दिशेने म हत्त्वाचे पाऊल आहे.

**दशकभराचा प्रादेशिक नेतृत्वाचा प्रवास**

२०१६ मध्ये मराठवाड्यातील पहिले बोन मॅरो प्रत्यारोपण केंद्र स्थापन केल्यानंतर रुग्णालयाने प्रगत पायाभूत सुविधा, संसर्ग नियंत्रण प्रणाली आणि किफायतशीर उपचार मॉडेल्सच्या साहाय्याने महानगरांप्रमाणे उच्च दर्जाचे परिणाम साध्य केले आहेत. या सामंजस्य कराराद्वारे रुग्णालयाने पुन्हा एकदा आपली वचनबद्धता अधोरेखित केली आहे. उपचार करणे, सेवा करणे आणि प्रत्येक मुलाला जीवनाची दुसरी संधी देण्यासाठी ठामपणे उभे राहणे.

**नेतृत्वाचे मार्गदर्शन**

आदरणीय श्री. प्रमोद अग्रवाल यांच्या दूरदर्शी मार्गदर्शनामुळे आणि एमएमआरआय कमलनयन बजाज रुग्णालयाचे नेतृत्व आदरणीय. श्री नीरज बजाज सर व आदरणीय कृति बजाज मॅडम यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे हा उपक्रम साकार झाला आहे. सुलभ, करुणामय आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा यावरील त्यांचा दृढ विश्वास रुग्णालयाच्या ध्येयाला दररोज अधिक सक्षम करतो.

## वर्तमानपत्राची मालकी व इतर विषयांसंबंधी माहिती

## घोषणा

### फॉर्म-४

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | छत्रपती संभाजीनगर |
| २. प्रकाशनाचा कालावधी | साप्ताहिक |
| ३. मुद्रकाचे नाव | श्री. रशपालसिंघ एन.अट्टल |
| भारताचे नागरिक आहेत का ? | होय |
| पत्ता | शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको, औरंगाबाद ४३१००३, |
| ४. प्रकाशकाचे नाव | श्री. रशपालसिंघ एन.अट्टल |
| भारताचे नागरिक आहेत का ? | होय |
| पत्ता | शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको, औरंगाबाद ४३१००३, |
| ५. संपादकांचे नाव | श्री. रशपालसिंघ एन.अट्टल |
| भारताचे नागरिक आहेत का ? | होय |
| पत्ता | शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको, औरंगाबाद ४३१००३, |

६. त्या व्यक्तींची नावे व पत्ते जे वर्तमानपत्राचे मालक आहेत तसेच संपूर्ण मालमत्तेच्या एक टक्क्यांपेक्षा अधिकचे वाटेकरी किंवा भागीदार आहेत.

मी श्री. रशपालसिंघ एन.अट्टल वरीलप्रमाणे घोषित करतो की, माझ्या माहितीनुसार व विश्वासानुसार वरील माहिती सत्य आहे.

स्वाक्षरी
**श्री. रशपालसिंघ एन.अट्टल**
(प्रकाशकाची स्वाक्षरी)

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199